**प्रेस नोट दि.१९/०५/२०१९**

**संचेती हॉस्पीटल येथे मिळुन आलेल्या आल्पवयीन मुलगा पालकांचे ताब्यात दिलेबाबत .**

**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

दि. ०९/०५/२०१९ रोजी पोलीस उप-निरीक्षक, कदम हे पोलीस ठाणे येथे ठाणे अमंलदार दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना संचेती हॉस्पीटल येथील सिक्युरिटी गार्ड यांनी पोलीस ठाणे येथे फोन करुन ०७ वर्षाचा मुलगा सापडला आहे. अशी माहिती दिल्याने पोलीस उपनिरीक्षक कदम यांनी तात्काळ शिवाजीनगर पोलीस चौकीचे कर्मचारी पो शि अमोल गाडेकर यांना संचेती हॉस्पीटल येथे पाठविले पो शि गाडेकर यांनी मिळुन आलेला मुलगा यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणल्यानंतर त्यास त्याचा नाव पत्ता विचारला असता सदर मुलाने त्यांचे नाव आयन मोबीन तांबोळी वय वर्षे ०७ महाड कोकण असे सांगितले त्याबाबत अधिक चौकशी करीत असताना,सदर मुलाचे मामा आफजान सादिक तांबोळी,रा. संतोषनगर सर्वे नं ६७ कात्रज पुणे हे पोलीस ठाणे येथे आले व ते त्यांच्या भाच्याबाबत चौकशी करीत असताना पोलीस उप-निरी.कदम यांनी एक ०७ वर्षाचा मुलगा मिळुन आलेला असलेबाबत सांगुन,सदर मुलास दाखविले असता आफजान तांबोळी यांनी सदरचा मुलगा हा भाचा असुन तो त्याची आजी व आजोबा यांचेसोबत मुंबई येथुन पुणे येथे आल्यानंतर शिवाजीनगर रेल्वे स्टेशन येथे उतरल्यानंतर कात्रज येथे जाणारी बस पकडताना तो हरवला असल्याचे सांगितल्याने त्याबाबत पोउनि कदम यांनी खात्री करुन सदर मुलास त्याचा मामा आफजान तांबोळी व आजोबा सादिक तांबोळी यांचे ताब्यात दिलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बापू शिंदे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली पो उप-निरी.सुर्यभान कदम, पो.शि.अमोल गाडेकर यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**